# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


३३२ - २३ दिनांक : - २३/०९/२०२३

## घरफोडी करुन चोरी करणाऱ्या सराईत आरोपींना अटक करुन एकुण १,१०,८४३/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत - नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक १५/०९/२०२३ रोजी फिर्यादी आनंद राजीव प्रसाद वय- २३ वर्षे यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, फिर्यादी हे दिनांक १३/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता ते १७.०० वाचे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे बंद घराचा कडी कोयंडा तोडून प्रवेशद्धारातून प्रवेश करुन घरातील सोन्याचे दागिने व रुपयांची रोख रक्कम असे एकूण २,७४,०००/- रुपयांचा ऐवज घरफोडी चोरी करुन नेला आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४४१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर तपासाच्या गुन्हयाच्या अनुशंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळाव भेट देवुन कौशल्यपुर्ण तपास केला असता, गुन्हयातील आरोपी हे विरार डि मार्ट परीसरात असल्याची माहीती प्राप्त झाल्याने सदर परीसरात त्यांचा शोध घेत असतांना ते मालमत्तेविरुध्दचे गुन्हे करण्याच्या तयारीत असतांना दिसून आले. त्यांना पोलीसांची चाहूल लागताच ते पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतांना गुन्हे प्रकटिकरण पथकाकडुन त्यांना पकडण्यात यश आले आहे. आरोपीत नामे १) आकाश मनोज गुप्ता, वय २५ वर्षे, रा.रु.नं.०२, जय अम्बे वेलफेयर सोसायटी, बावशेतपाडा, संतोष भुवन, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर, मुळ रा. गाव मडधनारे, पोटभारपार, सलीमपूर पो.स्टे, जिल्हा देवरीया, राज्य उत्तरप्रदेश, २) सौरभ देवशरन यादव, वय २५ वर्षे, मुळ रा. दनियापुर गाव, तहसिल कमासीन, जिल्हा प्रतापगड, राज्य उत्तरप्रदेश यांना नमुद गुन्हयात दिनांक १५/०९/२०२३ रोजी २३.३० वाजता अटक करण्यात आली. अटक आरोपीतांकडे सदर गुन्हयाच्या अनुशंगाने चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्यांच्याकडे अधिक तपास केला असता आरोपीतांनी नालासोपारा पोलीस ठाणे व विरार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये मागील काही दिवसामध्ये केलेल्या खालीलप्रमाणे ०५ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले व त्यांचेकडून गुन्हयात नमुद गुन्हयात चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी १,१०,८४३/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४४१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८०,३४ अन्वये |
| ०२ | नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४४२/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८०,३४ अन्वये |
| ०३ | नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४४३/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८०,५११,३४ अन्वये |
| ०४ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ८९४/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० अन्वये |
| ०५ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ८९६/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० अन्वये |

गुन्हयातील अटक आरोपीत नामे आकाश मनोज गुप्ता याचेविरुध्द यापूर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २०७/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३९२, ३९४, सह शस्त्र अधिनियम ३,२५ अन्वये |

गुन्हयातील अटक आरोपीत नामे सौरभ देवशरन यादव याचेविरुध्द यापूर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | कस्तुरबामार्ग पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I १०३०/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४,३८०,३४ अन्वये |
| ०२ | कस्तुरबामार्ग पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I १०४३/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४,३८०,३४ अन्वये |
| ०३ | नेहरुनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३८/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० अन्वये |
| ०४ | नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ८९४/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० अन्वये |
| ०५ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४१६/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० अन्वये |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र मोकाशी, सहा. पो.आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, पोहवा. किशोर धनु, हिरालाल निकुंभ, प्रशांत साळुंके, पो.ना. अमोल तटकरे, पोशि. कल्याण बाचकर. राजेश नाटुलकर, प्रेम घोडेराव, सोहेल शेख ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.

